सकाळ



दिल्ली : रवळनाथ सोसायटीतर्फे डॉ. भागवत कराड यांचा सत्कार करताना एम. एल. चौगुले. शेजारी शिवाजी पाटील, प्रा. व्ही. के. मायदेव आदी.

# रवळनाथ हौसिंग सोसायटीतर्फे नूतन केंद्रीय मंत्र्यांचा सत्कार

गडहिंग्लज, ता. १ : येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे नूतन केंद्रीय मंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. दिल्ली येथील महाराष्ट्रसदनात हा कार्यक्रम झाला. विदेश मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुढाकाराने दिल्ली येथील मराठी संस्था, पुढचे पाऊल, इन्स्टिट्यूट ऑफ पॉझिटिव्हिटी, इंडियन डायस्पोरा क्लब या संस्थांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

केंद्रीय मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील खासदारांचा नव्याने समावेश झाला आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड, पंचायत राज्य मंत्री कपिल पाटील यांच्यासह केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा सत्कार झाला. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते सत्कार झाले. चौगुले यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती मंत्र्यांना दिली. या वेळी भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे सहसचिव शिवाजी पाटील, रवळनाथचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव उपस्थित होते.

पुढारी



गडहिंग्लज : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे केंद्रीय पंचायत राज्यमंत्री ना. कपिल पाटील यांचा सत्कार करताना संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले.

# नूतन केंद्रीय मंत्र्यांचा 'रवळनाथ'तर्फे सत्कार

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झालेल्या महाराष्ट्रातील नूतन मंत्र्यांचा श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे दिल्ली येथील एका कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. विदेश मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुढाकाराने दिल्ली येथील मराठी संस्था, दिल्ली येथील अधिकारी, पुढचे पाऊल, इन्स्टिट्यूट ऑफ पॉझिटीव्हिटी, इंडियन डायस्पोरा क्लब या संस्थातर्फे हा कार्यक्रम पार पडला. दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनात हा कार्यक्रम झाला.

यावेळी केंद्रीयमंत्री नारायण राणे (सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय), ना. रावसाहेब दानवे (रेल्वे मंत्री), ना. डॉ. भागवत कराड (केंद्रीय अर्थराज्य मंत्री), ना. कपिल पाटील (केंद्रीय पंचायत राज्यमंत्री) यांचा रवळनाथचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार झाला.

यावेळी चौगुले यांनी सर्व मंत्र्यांना रवळनाथाच्या यशस्वी वाटचाली विषयी माहिती दिली. यावेळी भारत सरकार सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे सहसचिव शिवाजी पाटील, रवळनाथचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव उपस्थित होते.

# 'रवळनाथ' तर्फे केंद्रीय मंत्र्यांचा सत्कार

प्रतिनिधी
गडहिंग्लज

केंद्रीय मंत्रीमंडळाची नुकताच विस्तारीकरण झाले. या केंद्रीय मंत्रीमंडळातील महाराष्ट्रातील चार केंद्रीय मंत्र्यांचे येथील रवळनाथ को–ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी तर्फे दिल्लीतील महाराष्ट्र सदनात झालेल्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमूख उपस्थितीत डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुढाकाराने मराठी संस्था येथील पूढेच पाउल, इन्स्टीट्युट ऑफ पॉझिटिव्हीटी, इंडियन हायस्पोरा क्लब या संस्थेतर्फे हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी सुक्ष्म, लघू मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे–पाटील, केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड, केंद्रीय पंचायत राज्यमंत्री कपिल पाटील यांचा रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी बांधकाम क्षेत्रातील रवळनाथच्या योगदानाची माहिती दिली. कार्यक्रमास सहसचिव शिवाजी पाटील, रवळनाथचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव उपस्थित होते.



**दिल्ली : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा सत्कार करताना रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले, शेजारी केंदीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री डॉ. भागवत कराड, व इतर .**